# वृद्ध-निराधारांची स्नेहसावली



डॉ. बालाजी आसेगावकर
अध्यक्ष, सांजसावली केअर फाउंडेशन

**घरातील कर्ती मुलं नोकरीच्या चक्रात अडकल्यामुळे आपल्या वृद्ध आई-वडिलांकडे मनात असूनही लक्ष देणे त्यांना शक्य होत नाही. त्यातच कुटुंबातील वृद्ध व्यक्तीला अंथरुणावर पडून राहायची वेळ आली किंवा बेडरेस्ट आवश्यक असली तर मात्र मनात असूनही ही मुले हतबल होतात. काळाची ही गरज ओळखून डॉ. बालाजी आसेगावकर यांच्या नेतृत्वाखाली डॉ. जीवनज्योती कंदेवाड, डॉ. उज्ज्वला खाडे, डॉ. किरण मुंदडा, डॉ. अनुराधा अपसिंगेकर, डॉ. अस्मिता खोडवे, डॉ. अविनाश रत्नपारखी, डॉ. शिल्पा आसेगावकर, डॉ. छाया दौडे यांनी एकत्र येऊन कोल्हापूरच्या सावली केअर सेंटर पासून प्रेरणा घेऊन सांज सावली केअर फाउंडेशनची स्थापना केली. सध्याच्या काळातील अतिशय महत्त्वाच्या अशा या उपक्रमाची माहिती स्वतः डॉ. आसेगावकर यांच्या शब्दात...**

आजच्या धकाधकीच्या जीवनात आजारी व परावलंबी व्यक्तीला सांभाळणे अतिशय आव्हानात्मक कार्य आहे. कुटुंबात जर कुणी आजारी असेल तर अशा व्यक्तीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्यांचा आहार, विहार, भौतिक उपचार (फिजिओथेरपी)याशिवाय त्यांच्या जखमांची ड्रेसिंग पाठीवर जखमा होऊ नये म्हणून काळजी अशी अनेक आव्हाने अशा व्यक्तींना सांभाळताना येतात. एखाद्या कुटुंबाची जरी इच्छा असली तरीही त्यांना सांभाळणे अवघडच नाही तरी अशक्यप्राय गोष्ट आहे. यांना सांभाळण्यासाठी डॉक्टरांची नर्सेसची व सपोर्टिंग स्टाफची टीम घरी आणावी लागते. अशा परिस्थितीत शुश्रुषा केंद्र अर्थात नर्सिंग केअर सेंटर हाच एकमेव चांगला पर्याय असतो. अशा केंद्रात व्यक्तीला डॉक्टरांच्या देखरेखीखाली नर्सिंग केअर मिळते. समजा एखाद्याला पक्षाघात झाला तर त्यांना दवाखान्यात भरती करून आवश्यक असे उपचार सुरुवातीचे ३-४ दिवस असतात. त्यानंतर त्यांना फक्त नर्सिंग केअरची गरज असते. उदाहरणार्थ त्यांना नळीवाटे अन्न देणे, त्यांना बेडसोर होऊ नये म्हणून काळजी घेणे, त्यांच्याकडून फिजिओथेरपी करून घेणे, लघवीच्या कॅथेटरची काळजी घेणे, डायपर बदलणे इत्यादी. ही सर्व कामे आमच्या नर्सिंग केअर सेंटरमध्ये अतिशय सवलतीच्या दरात केली जातात. एकाच छताखाली डॉक्टर्स, प्रशिक्षित परिचारिका, केअर टेकर्स, समुपदेशक, फिजिओथेरपिस्ट, आहारतज्ज्ञ, उत्कृष्ट आहार अशा सर्व सेवा इथे घरगुती वातावरणात मिळतात. मागच्या साडेतीन वर्षांपासून स्नेह सावली केअर सेंटर आमची टीम औरंगाबादमध्ये चालवत आहे. विशेष म्हणजे हे सेंटर एक सामाजिक काम म्हणून चालवले जाते. यात ४०% जागा समाजात ज्यांना कोणीच नाही अशा निराधार गरजूंसाठी




Scanned with OKEN Scanner